# प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २९/०६/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपींचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) अनिकेत रुपराव राणे, वय ३४ वर्षे, पद : महसुल सहायक, नेमणूक : तहसिल कार्यालय, तिवसा, जि.अमरावती<br>२) प्रमोद ज्ञानेश्वरराव शिरसाट, वय ३७ वर्षे, पद : अव्वल कारकून, नेमणूक : तहसिल कार्यालय, तिवसा, जि.अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक : २३/०५/२०२२ चे १५.३० ते १७.४० वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | १२,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | तहसिल कार्यालय, तिवसा, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांचे आईचे नावाने असलेल्या मोझरी, ता.तिवसा येथील ले—आऊट मधील ३ प्लॉटचे क्षेत्रफळाची दुरुस्ती आदेशावर तहसिलदार, तिवसा, जि.अमरावती यांची सही घेवून देणेकरीता तहसिल कार्यालय, तिवसा येथील लिपीक श्री.राणे हे तक्रारदार यांचेकडे १५,००० रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २३.०५.२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे आईचे नावाने असलेल्या मोझरी, ता.तिवसा येथील ले—आऊट मधील ३ प्लॉटचे क्षेत्रफळाची दुरुस्ती आदेशावर तहसिलदार, तिवसा, जि.अमरावती यांची सही घेवून देणेकरीता तहसिल कार्यालय, तिवसा येथील श्री.राणे, महसुल सहायक यांनी तक्रारदार यांचेकडे १२,००० रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे तसेच तहसिल कार्यालय, तिवसा येथील श्री.शिरसाट यांनी तक्रारदार यांना श्री.राणे, महसुल सहायक यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक २५.०५.२०२२ व दिनांक २७.०६.२०२२ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे आज दिनांक २९.०६.२०२२ रोजी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपींविरुध्द पो.स्टे. तिवसा, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक संजय महाजन, पो.नि.सतीश उमरे, पो.ना.विनोद कुंजाम, युवराज राठोड, रोशन खंडारे, पो.कॉ.अभय वाघ व चालक पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क**: अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर—१०६४

-29/6/2022

(संजय महाजन)
पोलीस उपअधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner